।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION

Phone: (02462) 229542
Fax : (02462) 229574
Website: www.srtmun.ac.in
E-mail: bos.srtmun@gmail.com

प्रस्तुत विद्यापीठाच्या ललीत व प्रयोगजीवी कला संकुलातील, आंतर विद्याशाखेतील पदवी व पद्व्युत्तर स्तरावरील नृत्य, नाट्य, आणि संगीत, प्रथम वर्षाचा तसेच (लोककला एक वर्षाचा डिप्लोमा) **CBCS Pattern** नुसारचे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासून लागू करण्याबाबत.

## प रि प त्र क

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, **दिनांक २४ जानेवारी २०२० रोजी संपन्न झालेल्या ४६व्या मा. विद्या परिषद बैठकीतील विषय क्र.१३/४६–२०२०** च्या ठरावानुसार **प्रस्तुत विद्यापीठातील ललीत व प्रयोगजीवी कला संकुलातील आंतर विद्याशाखेतील पदवी स्तरावरील प्रथम वर्षाचा व (एक वर्षाचा पद्व्युत्तर डिप्लोमा)** खालील विषयाचा **C.B.C.S. (Choice Based Credit System) Pattern** नुसारच अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासून लागू करण्यात येत आहे.

1. Bachelor of Performing Arts (I,year)
2. Diploma in Folk Arts (One Year Diploma) - (लोककला)

सदरील परिपत्रक व अभ्यासक्रम प्रस्तुत विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेत–स्थळावर उपलब्ध आहेत. तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६.
**जा.क्र.:** शैक्षणिक–१/परिपत्रक/पद्वी/–सीबीसीएस अभ्यासक्रम/२०२०–२१/**१५४३**
**दिनांक** : २६.११.२०२०.

स्वाक्षरित/–
**सहा-कुलसचिव**
शैक्षणिक (१–अभ्यासमंडळ) विभाग

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :

१) मा. अधिष्ठाता, आंतर विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. संचालक, ललीत व प्रयोगजीवी कला संकुल प्रस्तुत विद्यापीठ.
४) साहाय्यक कुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
५) सिस्टम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

## प्रयोगात्मक लोककलांचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम कालावधी: एक वर्ष(Yearly Pattern)

एकूण अभ्यासक्रम ५०० गुणांचा सैद्धांतिक अभ्यास २५० गुणांचा कृती अभ्यास २५० गुणांचा

**एकूण पेपर ५**

### सैद्धांतिक अभ्यास

| | | |
|---|---|---|
| पेपर क्रमांक ०१: | लोकसाहित्य आणि लोककला | १००गुण |
| पेपर क्रमांक ०२: | लोककलांचा इतिहास आणि वर्गीकरण | १००गुण |
| पेपर क्रमांक ०३: | निवडक लोककलांची प्रयोगात्मक मूल्ये(सैद्धान्तिक अभ्यास)<br>अ)गोंधळ ब)जागरण क)भारुड ड)कीर्तन इ)तमाशा | ५०गुण |

### कृतीअभ्यास

| | | |
|---|---|---|
| | निवडक लोककलांची प्रयोगात्म मूल्य (तोंडी परीक्षा)<br>अ)गोंधळ ब)जागरण क)भारुड ड)कीर्तन इ)तमाशा | ५०गुण |
| पेपर क्रमांक ०४: | प्रयोगात्म लोककलामधील विशिष्ट घटकांचे व्यक्तिगत कौशल्य<br>(वादन, नर्तन, गायन, अभिनय) | १००गुण |
| पेपर क्रमांक ०५: | उपरोक्त पाच लोककला प्रकारांच्या सादरीकरणात समूह सहभाग | १००गुण |
| | **एकूण गुण** | **५००गुण** |

**Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded**

**School of Fine and Performing Arts**

**Syllabus of Folk Arts**

**Preamble:** S. R. T. M. University has proposed to commence one year post graduate drama performance is its basic characteristics. Hence performing Folk art has always been an indivisible part of community life and culture. Community life manifests itself through Folk Arts relating to contemporary life which are naturally inspired and instinctive traditionalism is their hallmark. That is why the entire Folk-Lore is said to be the 'Science of Tradition'. The legacy of Folk-Art is transmitted from generation to generation. Its form is like that of a banyan tree. The branches leaves and exposed toots become old and get withered while new ones sprout in their place. These manifestations of the people's songs dance and drama which spring from amongst the people and for the people, go into yet another bloom. The building blocks of contemporaneous community life which have outlived their relevance drop off and new shoots of new expression manifest themselves. Richard Dodson's in his book Folk Lore and Folk Life while defining performing Folk Art or what traditionally goes by the form Folk Play observes. Drama of any sorts calls for the creation of a play world by the players generally through use the conventional symbolic object, marks costumer, a special area for playing and conventional stylized actions. Indian culture is one of symbol. The core of Indian culture having a tradition of thousands of years was originally Folk Culture in which rites, action and plays relating to the power that underlines the governance of the university, hold a place of extraordinary importance. These ritualistic commandments took the form of performing arts with the changing times. Religion sects' customers traditions and faith expert a tremendous influence on the mass mind. Folk-lore and performing folk arts are woven around spiritualism socially awakening and entertainment.

Collection, Collation and presentation with studying the basic spirit of performing folk arts. A lot of creativity is possible through nature instincts in Folk-arts which also leads to personality developments. Recently Indian folk art has been getting professionalized at the national as well as international level. It also greatly influences theatre, films and all other art forms which skill fully utilized various folk-arts.

In modern times the study of music, dance and dramatics has become essential so is the case with the performing folk-arts which is increasingly finding its way in commercial arena.

The Folk-arts gets carried from one generation to other through an informal system of education-gurukul. But now its formal and scientific study has become imperative and hence an effort is being made to introduce a formal course in performing folk art at the university level.

Ordinance regulation and syllabus relating to the diploma course in performing folk arts. (W.e.f. academic year 2004-05)

- **Title:** Post Graduate Diploma Course in Performing Folk Arts
- **Eligibility:** Graduation in any faculty
- **Duration:** One Year
- **Fees:** Rs 11,810/-
- **Capacity:** 30 Students per course
- **Teacher's Qualification (Theory) (Practical):** An outstanding scholar with established reputation that shas made significant contribution to knowledge.
- **Medium:** Marathi
- **Scheme:** Theory and Practical

**Aims and Objectives of Lok Kala Academy:**

- To impart scientific knowledge of folk lore and performing folk arts
- To encourage the professionalism in performing folk art field.
- To Create the academic ambience in performing folk art field.
- To encourage the research, documentation and development work in PFA field.
- To create the powerful link between traditional approach and innovative approach.

To create an additional avenue of self-employment for students of the University of Mumbai and also to benefit the cultural arena by providing it with suitably trained person in the field of performing folk arts.

To prepare students to exploit opportunities in the field of performing folk arts, folk performances administration, folk research and exploit the possibilities of mass education and communication through folk performances which will help students to work with print media and electronic media through folk culture background.

To train all round folk-theatre professionals, who will provide leadership to the folk-theatre culture of the country and work as facilitators for national and international folk-theatre.

The academy will also undertake to plan and implement master courses and certificate courses in the field of performing folk arts in future students of the university.

**Eligibility:** The selection of candidates for admission to the post graduate diploma course in performing folk arts will be based on:

A bachelors' degree in any subject/faculty from any recognized university. Plus experience of participating in theatre, folk-theatre activity. (Preference will be given to students or practitioners of the performing arts such as folk, theatre, music, dance and traditional theatre, etc.) Entrance examination, Performance Test, Interview and Aptitude test (Written and Practical).

**Title of Course:** Post Graduate Diploma Course in Performing Folk Arts.

**Syllabus:**

- Paper No. 1: Folk Lore and Folk Arts 100 Marks
- Paper No. 2: History of Folk Arts and Classification 100 Marks
- Paper No. 3: Performing elements of Folk Arts 100 Marks
- Paper No. 4: Practical's of Folk Arts (Individual) 100 Marks
- Paper No. 5: Components of Folk Arts and Participation of an Individual in group folk arts 100 marks

Total 500 Marks

**Duration of Course:** One Year

Fees: Rs 11,810/- (Rs. Eleven thousand eight hundred ten only which includes, tuition fees Rs /- 10000/- +Exam fees Rs 810/- + Registration form fee Rs. 25/- + Library fee Rs 150/-+ syllabus and other fee Rs 25/-)

**Medium of Language: Marathi**

**Address: -** School of Fine and Performing arts, S R T M University, Nanded.

## पेपर क्रमांक ०१: लोकसाहित्य आणि लोककला गुण १००

## Paper No. 01: Folk Lore and Folk Arts Marks 100

लोकसाहित्याचे अविभाज्य अंग म्हणून लोककला ओळखल्या जातात. लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे प्रत्येक लोकसमूहाच्या वर्तमान आविष्काराचा स्थलकाल, सापेक्ष अभ्यास, पारंपरिकता, मौखिकता, सहजस्पूर्तता, उत्स्फूर्तता, स्थल–काल संवादित्व व नित्यनूतनता आविष्कारांची भारतभूमी ही लोककलांची वैशिष्ट्ये म्हणता येतील. लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याचे व्यक्त कृतीरूप म्हणजे लोककला प्रकार. लोककलांचा इतिहास समजावुन घेताना लोकसाहित्याचा अभ्यास अत्यावश्यक व अनिवार्य आहे. त्यात खालील प्रकरणे समाविष्ट करण्यात आली आहेत.

**लोकसाहित्य:** व्याप्ती, उत्पत्ती, विकास

: लोकसाहित्याचे स्वरूप व इतिहास

: लोकसाहित्याचे वर्गीकरण

: लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या दिशा

अ. सांस्कृतिक इतिहास

ब. धर्मेतिहास

क. समाजशास्त्रीय अभ्यास

ड. भाषाशास्त्रीय अभ्यास

इ. मानववंशशास्त्रीय अभ्यास

ई.मानसशास्त्रीय अभ्यास

उ. लोकसाहित्य आणि लोककला परस्पर संबंध

ऊ. लोकसाहित्याची अभ्यास पद्धती

अ. क्षेत्रीय अभ्यास ब. ग्रांथिक अभ्यास

ए.लोकसाहित्याच्या अभ्यासाचा इतिहास

## पेपर क्रमांक ०२: लोकसाहित्य आणि लोककला आणि वर्गीकरण गुण १००

## Paper No. 02: History of Folk arts and Classification Marks 100

समूह मनाचा गीत, नृत्य, नाटय, संगीतमय अविष्कार म्हणजे लोककला प्रयोगात्मता हा लोककलांचा स्थायीभाव असतो, लोककलांचे निर्वहण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मोखीक परंपरेने होते. यातुक्रिया, यात्वात्मक विधी, विधिनाट्चे हा लोककलांचा मूळ स्त्रोत होय. वनसंस्कृती, ग्राम संस्कृती आणि नागरी संस्कृती या मानवी विकासाच्या तीनही अवस्थांमध्ये लोककलांचे दर्शन ठायी ठायी घडते. आध्यात्मिक उद्‌बोधन, लोकप्रबोधन आणि निखळ रंजन या त्रिसूत्रीवर लोककलांचा डोलारा उभा आहे.

१. लोककला: व्युत्पती, उत्पत्ती, व्याख्या

२. लोककलांची गुणवैशिष्ट्ये:

अ. पारंपरिकता

ब. मौखिकता

क. स्थलकाल संवादित्व

ड. आध्यात्मिक उद्‌बोधन, लोकप्रबोधन, लोकरंजना सारखे विशिष्ट हेतू, देवदेवतांचे तुष्टीकरण समष्टीचे तुष्टीकरण

इ. सहजस्फूर्तता, उत्स्फूर्तता

ई. देवतावतरण, देवतासंचार, देवता संकिर्तन

ड. भारीतभूमी

३. लोककलांचा आकृतीबंध

अ. शिथीलता, लवचिकता

ब. लोकधाटी शैलीचा

४. लोककलांच्या वर्गीकरणाच्या पद्धती

सापेक्ष वर्गीकरण

अ. अंगणीय कलाप्रकार

ब. प्रांगणीय कलाप्रकार

क. मंदिर परिसरातील कलाप्रकार

ड. कृषी क्षेत्रातील कलाप्रकार

रस सापेक्ष वर्गीकरण

अ. वीररसप्रधान लोककला

ब. शृंगार रस प्रधान लोककला

क. भक्तिरस प्रधान लोककला

ड. वात्सल्य, करूण रस प्रधान लोककला

हेतू सापेक्ष वर्गीकरण

अ. सकाम भक्तीचे लोककला प्रकार

ब. लोकप्रबोधनाचे लोककला प्रकार

क. रंजन प्रधान लोककला प्रकार

प्रादेशिक वर्गीकरण

अ. खान्देशी लोककला

ब. वाईट देशी लोककला

क. वैदर्भीय लोककला

ड. कोकणातील लोककला

इ. मराठवाड्यतील लोककला

ई.पश्चिम महाराष्ट्रातील लोककला

समाजसापेक्ष वर्गीकरण

अ. आदिवासींच्या लोककला

ब. भटक्या—विमुक्तांच्या लोककला

क. अठरापगड जाती जमातींच्या लोककला

संप्रदाय सपेक्षा वर्गीकरण

अ. महानुभाव संप्रदायाचे लोक कलाप्रकार

ब. नाथ संप्रदायाचे लोक कलाप्रकार

क. वारकरी संप्रदायाचे लोक कलाप्रकार

ड. दत्तसंप्रदायाचे लोककला प्रकार

इ. समर्थ संप्रदायाचे लोक कलाप्रकार

ई.शाक्तपंथीय लोक कला प्रकार

उ. सत्यशोधक चळवळीतील लोकांना प्रकार

ऊ. साम्यवादी चळवळीतील लोककला प्रकार

ए.समाजवादी चळवळीतील लोककला प्रकार

ऐ. विशिष्ट धर्म संस्कृतीचा प्रचार—प्रसार करणाऱ्या लोककला प्रकार

५. लोककलांचे व प्रकार उपप्रकार

६. लोककलांचे मौखिक परंपरेतील सौंदर्यस्थळे

७. लोककलांचा आदिबंधात्मक अभ्यास

८. लोककलांचा आणि शैलीचा अभ्यास

९. महाराष्ट्रातील लोककला प्रकार व अन्य देश प्रांतातील लोककला प्रकार यांचा तौलनिक अभ्यास उदाहरणार्थ

अ. तमाशा—नोटंकी—जत्रा

ब. लळीत, दशावतार—यक्षगान—भवाई

क. किर्तन, भारुड—पंडवानी—चारणगायन

ड. धनगरी ढोल नृत्य—ढोलु कुणीथा—थपेटू गुल्ल—भांगडा

इ. कलगीतुरा मांगणियार गायन

ई. तालवाद्य कचेरी—सिद्धी धमाल

उ. चित्रकथी—काष्ठपांचालीका—राजस्थानातील कटपुतली

ऊ. आदिवासी घुसड, ढेमसा नृत्य—सिद्धी धमाल

## पेपर क्रमांक ०३: लोककलांचे प्रयोग रूप — गुण १००

## Paper No. 03: Performing elements of Folk arts — Marks 100

लोककलांच्या प्रयोगारूपांचा अभ्यास हाकृती अभ्यास विभागाखाली समावेश करण्यात आला असून यात लोककलांची रचनातत्वे आणी रचनातत्वांची प्रात्यक्षिके अभिप्रेत आहेत. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशातील लोककला प्रकारांचा विचार करता पूर्वरंग आणि उत्तरंग हे सूत्र दिसते.

१. पूर्वरंग: पूर्वरंगातील घटक

अ. देवतेला आवाहन

ब. देवतेला रंगस्थळी पाचारण

क. गण

ड. गौळणी, स्फुट पदे

इ. स्फुट पदांची संपादणी

ई.सूत्रधार पात्रांचे परस्परांमधील हास्यविनोद

२. उत्तरंग

अ. आख्यानपर कथा, काव्याचे सादरीकरण केवळ गायकी संपादनातून

ब. कथा काव्याचे नाट्यत्मक सादरीकरण

क. आरती अथवा भैरवी

कृती अभ्यासासाठी पाच लोककला प्रकारांची निवड खाली करण्यात आली असून त्याच्या पूर्वरंगाची आणि उत्तरंगाची प्रात्यक्षिके या पेपरमध्ये अपेक्षित आहेत.

१. तमाशा

२. भारुड

३. जागरण—गोंधळ

४. खडीगंमत

५. दशावतार

१. तमाशा पूर्वरंग:

:ढोलकी—हलगी जुगलबंदी

:गण

:मुजरा नृत्य

:गौळण

अ. हाळीचीगौळण

ब. तक्रारीचीगौळण

क. विनवणीचीगौळण

:तात्या—बापू बतावणी अर्थात रंगबाजी

: फार्स

तमाशा उत्तरंग: वगनाट्य

भैरवी

२. भारुड पूर्वरंग : जय जय राम कृष्ण हरी भजन

: अभंग पंचक

: विठ्ठल विठ्ठल गजर

: गौंळणीचे गायन

: चक्रीभजन

उत्तरंग : विठ्ठल विठ्ठल नाम गजर

: रामायण, महाभारत पुराणातील एखादया कथेवर नाट्य रूपी

भारुड अथवा वासुदेव, वाघ्यामुरळी, भालदार—चोपदार, कैकाडीन अशी संगे

: भैरवीचा अभंग

: नामघोष

३. जागरण गोंधळ पूर्वरंग

: देवतेची घटस्थापना

: देवतेला आवाहन, स्तवन

: देवतेला रंगस्थळी पाचारण

: गणगौंळण

: स्फूट पदे

: स्फूट पदांच्या सादरीकरणात प्रेक्षकांची विनोदाच्या पातळीवर संवाद

४. जागरण गोंधळ उत्तरंग : खंडोबा, अंबाभवानीच्या उत्पत्तीची अथवा दैत्य निर्दालनाची कथा,

शंकर—पार्वती—गंगा, खंडोबा—म्हाळसा—बाणाईयांच्या लग्नाची कथा नाट्यात्म पद्धतीने सादर करणे

: भैरवीचे पद

: लंगर तोड

: घटाचे उत्थापन (देवतेचे निर्गमन)

खडीगंमत पूर्वरंग : ढोल—ढोलकी—सनई—सुरनई यांची जुगलबंदी

: गण गौंळण

: सांगीव

उत्तररंग : वगनाट्याचे सादरीकरण

५. दशावतार पूर्वरंग : नामघोष

: अभंग पंचक

: सूत्रधार—गणपती—रिद्धी—सिद्धी—भटची प्रवेश, संकासूर प्रवेश

: नाम गजर

उत्तररंग : रामायण, महाभारत पुराणातील एखाद्या कथानकाचे संगीत नाटकासारखे नाट्यत्मक सादरीकरण

: भैरव

: आरती

## पेपर क्रमांक ०४: लोककलांचा कृती अभ्यास गुण १००

## Paper No. 04: Practicals of Folk Arts Marks 100

तमाशा, भारुड, जागरण—गोंधळ, खडीगंमत,दशावतार या पाच लोककलांच्या संरचनेचा आकृतिबंधाचा या आकृतिबंधातील प्रत्येक घटकाचा अभ्यास विद्यार्थयांना अनिवार्य आहे.

उपरोक्त लोककला प्रकाराच्या बृहत् अभ्यासानंतर त्यातील प्रत्येक घटकाचा सूक्ष्म अभ्यास अपेक्षित असून एकूण १०० गुणांपैकी ५० गुण इंडोर स्टडी साठी दिले जातील. हा इंडो स्टडी विद्यार्थयांचा कल लोकनृत्य, लोकगीत गायन, लोकनाट्य, लोकवाद्यवादन या चार पैकी ज्या शाखेत आहे ते लक्षात घेऊन कोणत्याही एका शाखेच्या सूक्ष्म अभ्यासासाठी दिले जातील व उर्वरित ५० गुण लोककलांचे जे खालील निर्देशित घटक आहे त्यांच्या अभ्यासासाठी दिले जातील.

उपरीनिर्दिष्ट पाच लोककला प्रकाराच्या समानधर्मी घटकांच्या कृती अभ्यास

अ. वाद्यमेळाच्या प्रारंभीच्या वादनातून प्रयोगाचे सूचन

ब. नामघोष, देवता आवाहनाच्या गायकीचे विविध प्रकार

क. झिल सदृश्य गायकीचे विविध प्रकार

ड. संपादणी/बतावणीचे विविध प्रकार

इ. म्हणणी—संपादणी—पात्र प्रवेश—पुन्हा म्हणणी असा सूत्रधार, मुख्य गायक अथवा नायकाचा प्रवास

ई.समग्र रंगभूमीवखंडित रंगभूमीची संकल्पना

उ. रंग स्थळी देवातावरण—देवता आवाहन—देवता संचार—देवता निर्गमन असा प्रवास

## पेपर क्रमांक ०५: लोककला प्रकारातील घटक व सामूहिक लोककला प्रकारातील व्यक्तिगत सहभाग — गुण १००

## Paper No. 05: Components of Folk Arts and Individual Participation in Group Folk Art Forms — Marks 100

---

लोककला प्रकारातील अभिनय, नृत्य, संगीत, रंगभूषा, वेशभूषा, रंगस्थळ, पायांचे परस्परसंबंध, त्यांचे आगमन, निर्गमन, रंगस्थळी अवसान यांचा तपशीलात अभ्यास आवश्यक असतो त्यातील घटक पुढीलप्रमाणे:—

**अभिनय**:—

१. अभिनय सराव पद्धतीच्या विविध क्रीडा

अ. भावकाम

ब. विषयाशी एकाग्रता

क. शारीरिक हालचाली (लवचिकता वाढविण्यासाठी)

ड. त्वरित सहज स्फूर्तता आणि उत्स्फूर्तता

इ.विविध जीवनशैलीचे निरीक्षण

ई.कल्पकता वाढवण्यासाठी सराव

उ. निरोगी आणि लवचिक शरीर, मन व बुद्धी संतुलन

ऊ. एखाद्या लोक आविष्काराचा अभ्यास व त्याचे नाट्यीकरण

ए.कलाकारांचा आविष्कार—पर्यावरणाशी संबंध

: कलाकारांची परस्पराशी आदान—प्रदान

: कलाकारांचे अवस्थातंरण

: लोककला प्रकारातील विवक्षीत संघर्ष स्थळ

: लयबद्ध शारीरिक हालचालींचा अभ्यास,उच्चारण, आवाजाची फेक, शब्दांचे वनज, आवाजातील चढ—उतार

: अवयवांच्या भावपूर्ण हालचाली

: पद्य आणि गद्याची नाट्यात्मकता

: उभे राहण्याचे विविध पवित्रे, हालचाली

: संवादाच्या विविध भरती

लोकलमधील प्रस्तुती तंत्र

अ. कलाकारांची रंगस्थळी संरचना, दृश्यरूप

ब. प्रस्तुतीतील विभाव, अनुभाव आणि संचारी भाव

क. रंगस्थळीची कलाकारांची प्रसंगांनुरुप लयबद्ध, गतिशील प्रसूती

ड. लोककलांच्या प्रस्तुतीतील प्रसंगाची लयबद्धता, गतिशीलता

इ. लोककला प्रकारातील विविध प्रसंगाचे भान आणि अवसान

ई.लोककलाकारांची व्यक्तिचित्रंणातील अवस्थांतरणाची गतिशीलता

उदा.(कथाकथनकार सूत्रधार पात्र कथाकथनकार दुसरे पात्र)

उ. लोककथा, कथा व प्रसंगाची काल संवादी निवड

रंगतत्र

अ. भारत भूमीची निवड, वैशिष्ट्ये

ब. कपडे पटांची रंगसंगती, कपडे पटाचा पोत, कपडे पटाचा आकार, कपडे पटावरील कलात्मकता (कपडे रंगसंगतीतील प्रसंगानुरूप संवाद विसंवाद भिन्नता लाधर्म्य)

क. अवकाश आकण प्रकाश, प्रकाशाची रंगसंगती, प्रकाशाची तीव्र—मध्यमता, कपडेपटांची रंगसंगती आणि प्रकाशाची रंगसंगती संबंध

रंगभूषा: रंगभूषा मुखवटे आणि मेकअप, मुखवटयांची निवड, मुखवटयांची रंगसंगती, मुखवट्यांमागील प्रतीके, मुखवटे घालणे आणि काढणे विध्यात्मकथा

पारंपरिक लोककला प्रकारांचे दर्शन विद्यार्थयांना प्रत्यक्ष त्या कुळधर्म कुळाचार सण—उत्सव यात्रा—जत्रांतुन किमान वर्षातून एकदा तरी व्हावे म्हणून सर्व विद्यार्थयांना क्षेत्रीय अभ्यासासाठी एका ठिकाणी घेऊन जाणे अभ्यासक्रमाचा एक अनिवार्य कण असेल. उदा. पंढरपूरला निघालेल्या दिंड्या—पालख्या नारायणगावची जत्रा, त्यातील तमाशे जेजुरीची यात्रा त्यातील वाघ्या मुरळयांच्या जागरण—गोंधळ प्रकाराचा अभ्यास.

लोककलांचा अन्य प्रसार माध्यमावरील प्रभाव अभ्यासणे हादेखील विद्यार्थयांच्या अभ्यासक्रमातील एक मुद्दा असू शकेल.

## संदर्भग्रंथ


१. लोकसंस्कृतीचे उपासक : डॉ. रा. ची. ढेरे

२. लोकसंस्कृतीची शेतीचे : डॉ. रा. ची. ढेरे

३. लोकसाहित्याची रुपरेषा : डॉ. दुर्गा भागवत

४. मराठवाड्यतील कलगीतुऱ्याची अध्यात्मिक शायरी : डॉ. प्रभाकर मांडे

५. लोकसाहित्याचे अंत प्रभाव : डॉ. प्रभाकर मांडे

६. लोकसाहित्याचे स्वरूप : डॉ. प्रभाकर मांडे

७. गावगाड्याबाहेर : डॉ. प्रभाकर मांडे

८. लोकरंगकला आणि नागररंगभूमी : डॉ. प्रभाकर मांडे

९. लोकरंगभूमी : डॉ. प्रभाकर मांडे

१०.लोकनाट्याची परंपरा : वि. कृ. जोशी

११.मराठी रंगभूमीचा पूर्वरंग : कृ. बा. मराठे

१२.एक होता राजा : डॉ. सरोजनी बाबर

१३.भारतीय संस्कृती कोष : महादेवशास्त्री जोशी

१४.मराठी लोकनाट्य तमाशा : नामदेव व्हटकर

१५.मराठी लावणी : डॉ. म. वा. धोंड

१६.नाचू कीर्तनाचे रंगी : डॉ. यशवंत पाठक

१७.लोक नांगर रंगभूमी : तारा भवाळकर

१८.आंबेडकरी जलसे : प्रा. भगवान ठाकूर

१९. दलितांची शाहिरी कविता : डॉ. कृष्णा किरवले

२०. लोक रहाटीच्या वाटे : डॉ. गंगाधर मोरजे

२१.मराठी लावणी वांडमय : डॉ. गंगाधर मोरजे

२२. इंडियन नॅशनल थिएटर लोककला संशोधन केंद्राच्या संशोधन पुस्तिका

जागरण : प्रकाश खांडगे

गोंधळ : गणेश हाके

दशावतार : तुलसी बेहरे

वासुदेव : अशोजी परांजपे

२३. लय ताल विचार : डॉ. शरदचंद्र गोखले

२४. लोकधाटी : द. ग. गोडसे

२५. शाहिरी वांडमयाच्या धारा : डॉ विश्वनाथ शिंदे
२६. अंधारातील लावण्या : य. न. केळकर
२७. Tradition of India Theatre : M. L. Warhadpande
२८. Standard dictionary of Folk Lore, Mythology and Legend
२९. Folk Dances of Maharashtra : Mr Agerkar
३०. Tradition Mass Media : Shyam Parmar
३१. Primitive Culture : E. B Tylor
३२. Pattern of Culture : Ruth Benedict
३३. The Nature of Culture : A. K. Kroeber

**अभ्यासक्रमासाठी ग्रंथ**

१. महाराष्ट्राच्या प्रयोगात्म लोककला साहित्य संस्कृती मंडळ महाराष्ट्र राज्य : प्रा. डॉ. प्रकाश खांडगे
२. तमाशा—एक रांगडा खेळ : डॉ. गणेश चंदनशिवे
३. लोकरंगभूमी : डॉ. प्रभाकर मांडे
४. लोकसाहित्याचेअंत:प्रवाह : डॉ. प्रभाकर मांडे
५. लोकसाहित्याचे स्वरूप : डॉ. प्रभाकर मांडे
६. भंडार बुका : प्रा. डॉ. प्रकाश खांडगे
७. लोकसाहित्याची रुपरेखा : डॉ. दुर्गा भागवत
८. भारतीय रंगभूमीच्या शोधात : डॉ.रा. चिं. ढेरे
९. लोकसंस्कृतीचे उपासक : डॉ.रा. चिं. ढेरे
१०.शाहिरी वाडंमयाच्या धारा : डॉ. विश्वनाथ शिंदे
११.नाचू कीर्तनाचे रंगी : डॉ. यशवंत पाठक
१२.भारूडातील पर्यावरण : डॉ. रामचंद्र देखणे
१३.मराठी तमाशा : नामदेव व्हटकर
१४.तमाशा लोकरंगभूमी : डॉ. रुस्तम अचलखांब

# उद्दिष्टे, उपयुक्तता

- **पेपर क्रमांक १:** लोककला या लोकसाहित्याचे अविभाज्य अंग असल्याने किंबहुना ते लोकसंस्कृतीचे व्यक्तरूप कृतीरूप असल्याने लोकसाहित्याचा अभ्यास हा लोककलांच्या अभ्यासात पायाभूत अभ्यास ठरतो.लोकसाहित्याच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांना या चाकोरीबाहेरच्या ज्ञान शाखेची परिपक्वता येण्यास मदत होईल.
- **पेपर क्रमांक** २:व्यक्तिगत आणि समूहाच्या पातळीवर जीवन जगणाऱ्या मानवजातीच्या अवस्थांतरणाचा विचार म्हणजेच मानवी संस्कृतीचा विचार लोककलांच्या उत्पत्ती सोबत करावा लागतो. लोककलांचा इतिहास मानवी संस्कृतीच्या इतिहासाशी संलग्न असल्यामुळे हा इतिहास समजून घेणे आणि लोककलांचे वर्गीकरण करणे हे लोककलांच्या समग्र अभ्यासासाठी आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची या क्षेत्रातील बहुश्रुतता वाढीस लागेल.
- **पेपर क्रमांक ३**:विशिष्ट लोककलांची विशिष्ट गुणवैशिष्ट्ये असतात ही गुणवैशिष्ट्ये ज्ञात असली की त्या लोककलांच्या सामर्थ्य आणि मर्यादांची जाणीव, त्यांचे आकलन विद्यार्थ्यांना गरजेचे असते त्यासाठी गोंधळ, जागरण, भारुड, कीर्तन, तमाशा या लोककला प्रकाराची निवड करण्यात आली आहे.उपरोक्त निवडक लोककलांची मौखिक परंपरा विद्यार्थ्यांना तोंडी परीक्षेद्वारे समृद्धपणे मांडता येईल.
- **पेपर क्रमांक** ४:प्रयोगात्मक लोककलांचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमात कौशल्य विकास तसेच रोजीरोटी मिळवून देणारा रोजगाराभिमुख अभ्यासक्रम असल्याने वादन, नर्तन, गायन, अभिनयाच्या प्रत्यक्ष कृतिशील शिक्षणात विद्यार्थी पूर्णवेळ व्यावसायिक कलावंत होतील.
- **पेपर क्रमांक** ५:प्रयोगात्मक लोककलांमधील वादन, गायन, नृत्य, अभिनय आदि घटकांमधील कोणत्याही एका घटकाचे विशेष प्राविण्य विद्यार्थ्यांना गरजेचे असतेच पण त्यासोबत समूह कौशल्य, टिमवर्क ही गरजेचे असते. त्याचे प्रत्यक्ष ज्ञान झाल्याने विद्यार्थी कुशल कलावंत होऊ शकतो.